वर्ष- १० | अंक- १६ | मुंबई, मंगळवार, ५ मार्च ते ११ मार्च २०२४ | पृष्ठ-४

मूल्य २/- रुपये

ठाणे आवृत्ती

मराठी साप्ताहिक

R.N.I. No. MAHMAR/2014/60133

POSTAL REGISTRATION No.PLG/205/2022-2024

# पोलीस बातमी पत्र

POLICE BATMI PATRA

पोलीस बातमी पत्र

● संपादक : दिपक मोरेश्वर नाईक

www.policebatmipatra.in | policebatmi | police batmi patra | policebatmipatra | policebatmipatra@gmail.com



3 → मुलांशी सायबर-संवाद साधायचा कसा?

तुमचे केस, तुमच्या आरोग्याचा आरसा ← 4

# बाजीराव धर्माधिकारी, केतकी चितळे यांच्यावरील खोटे गुन्हे पोलीस प्रशासनाने मागे घ्यावेत अन्यथा राज्यात आंदोलन - संजय सुपेकर

## परळी पोलिस ठाण्यात समाजाचे ठिय्या आंदोलन

## महाराष्ट्रात प्रथमच आयोजकांवर खोटा गुन्हा दाखल

## राज्यात शांतता व सुव्यवस्थेचा गंभीर प्रश्न

## महाराष्ट्रात ब्राम्हण समाजाला टार्गेट करणाऱ्यांची संख्या वाढली



**■मुंबई,प्रतिनिधी,**

बीड जिल्ह्यातील परळी वैजनाथ येथे २५ फेब्रुवारी २४ रोजी सखल ब्राह्मण महासंघाच्या वतीने महाराष्ट्रातील संपुर्ण ब्रम्हवृंदासाठी ऐक्य परिषदेचे आयोजन करण्यात आले होते. या परिषदेस महाराष्ट्रातील असंख्य नागरिकांसह राजकीय लोक प्रतिनिधी व संत महंतांनी हजेरी लावली होती. या ऐक्य परिषदेतील व्यासपीठावरील मान्यवरांनी आपआपली वैयक्तिक मते मांडून ब्रम्हवृंदांना सखोल मार्गदर्शन केले. या ऐक्य परिषदेमुळे अनेकांची पोटे दुखु लागल्याने ब्राह्मण समाज कसा काय एकत्रित आला अनेकांच्या मनात एकच धडकी भरत होती. त्यामुळे या ऐक्य परिषदेचे कटकारस्थान रचून मा.नगराध्यक्ष बाजीराव भैय्या धर्माधिकारी व अभिनेत्री कु. केतकी चितळे यांच्याविरुद्ध षडयंत्र रचून परळी पोलीस ठाण्यात खोटा गुन्हा दाखल करण्यात आला. अशाप्रकारे गुन्हा दाखल होण्याची महाराष्ट्रातील पहिलीच घटना असल्याचे दिसून येत आहे.सदरील कथित गुन्हे तात्काळ मागे घ्यावेत अशा आशयाचे निवेदन मा. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री अजित पवार, केबिनेट मंत्री अतुल सावे, महाराष्ट्राचे पोलीस महासंचालक आदिंना महाराष्ट्र प्रदेश प्रवक्ता तथा महाराष्ट्र युनियन ऑफ जर्नालिस्ट चे मराठवाडा अध्यक्ष संजय कुलकर्णी (सुपेकर) यांनी दिले आहे.

महाराष्ट्राला वैचारीक परिषदा संमेलनाचा समृध्द वारसा आहे. विचारमंथनाची ही परंपरा पुढे घेवून जात असताना अशा विचार व्यासपीठाचे आयोजन करणारेच अडचणीत आणून एक प्रकारे अभिव्यक्ती स्वातंत्र्यावर गदा आणण्याचे प्रकार सुरु झाले आहेत. अशाच प्रकारचा गुन्हा परळी वैजनाथ जिल्हा बीड येथे २५ फेब्रुवारी २४ रोजी आयोजित करण्यात आलेल्या ब्राह्मण ऐक्य परिषदेचे स्वागताध्यक्ष बाजीराव भैय्या धर्माधिकारी व ज्यांनी व्यासपीठावरुन आपले वैयक्तिक मत मांडले अशा अभिनेत्री केतकी चितळे यांच्यावर कुटनीतीतून परळी वैजनाथ पोलीस स्टेशन येथे खोटा गुन्हा दाखल करण्यात आला आहे. ही अत्यंत दुर्देवी बाब आहे. विशेष म्हणजे या ऐक्य परिषदेचे उद्घाटन राज्याचे कृषीमंत्री ना. धनंजय मुंडे, भाजपाच्या राष्ट्रीय सरचिटणीस पंकजाताई मुंडे, आ. नमिताताई मुंदडा, यांच्यासह असंख्य लोकप्रतिनिधी व संत महंत उपस्थित होते. त्यांच्या साक्षीने संपुर्ण कार्यक्रम यशस्वी झाला. कोणत्याही समाजाचे संम्मेलन वा परिषद असेल तर त्या व्यासपीठावरुन सादक -बाधक अशा मुद्द्यावर स्वतःची मते मांडली जाणारच हे नैसर्गिक आहे.





परंतु शेवटी सर्व संमतीने कोणते ठराव मांडले गेले व मंजूर केल्या गेले त्यावरुन त्या संमेलन अथवा परिषदेची समग्र भुमिका ठरली जाते. संपुर्ण संम्मेलनात कोण काय मत व्यक्त करतो, कोणाची काय व्यक्तिगत मते असतात हि केवळ विचारमंथनाची प्रक्रिया असते. या संपुर्ण संम्मेलनात कोणा एकाने मांडलेली भुमिका किंवा मत हे संपुर्ण त्या परिषदेची किंवा संम्मेलनाची पयार्याने समाजाची एकमुखी भुमिका असते. तसेच परळीत झालेल्या ब्राह्मण ऐक्य परिषदेत कोणाचाही विरोध करणारा किंवा अन्य कोणत्याही समाजाच्या न्यायहक्कावर गदा येईल असा कोणताही ठराव मंजूर झाला नाही. केवळ ब्राह्मण समाज व त्या समाजाला सातत्याने भेडसावणाऱ्या व भारताच्या नागरिकाला मिळलेल्या घटनेतून ही या ऐक्य परिषदेची भुमिका घेण्यात आली आहे. परंतु कोणाच्या एखाद्याची भुमिका ही सर्व समाजाची भुमिका समजून विनाकारण सकारात्मकतेचे नकारात्मक चित्र तयार करणे हे योग्य ठरणार नाही. कोणीही किंमत नसलेल्यांनी आणि राज्यातील ब्राह्मण समाजाविषयी तोंडसुख घेऊन आपली दुकानदारी चालवावी या स्वरुपाचे प्रकार दिवसेंदिवर वाढत चालले आहेत. त्यामुळे शांतता सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होत आहे. सार्वजनिक कार्यक्रमात कोणी काय बोलावे हा त्याचा वैयक्तिक प्रश्न असतो. एका विशिष्ट ब्राह्मण समाजावर आजपर्यंत अनेकवेळा टिका टिपन्नी करुन पातळी सोडलेले लोक देखील प्रतिष्ठीतपणाचा बुरखा घालून मोकाट जनावरांसारखे फिरत आहेत. नुकतेच तथाकथित सरपंचाने संपुर्ण राज्यातील ब्राह्मण समाज ३ मिनिटात संपवून टाकेन अशी उग्र भाषा इलेक्ट्रॉनिक चॅनलव्दारे पसरवून दहशत निर्माण केली आहे. तो व्यक्तीही सध्याच्या परिस्थितीत मोकाटपणे फिरत असल्याचे दिसून येत आहे. हिच का लोकशाही? असा प्रश्न शासनाला महाराष्ट्र प्रदेश प्रवक्ता संजय सुपेकर यांनी केला आहे. परळी येथील ऐक्य परिषदेचे आयोजन संपुर्ण परळीकरांनी केले होते. आयोजकावर गुन्हा दाखल होण्याची ही महाराष्ट्रातील पहिलीच वेळ असून अशाप्रकाराने कोणीही राज्यात सार्वजनिक कार्यक्रम घ्यायला पुढाकार घेणार नाही. महाराष्ट्रातील सखल ब्राह्मण समाज अत्यंत शांतप्रिय असून तो कोणाच्याही अध्यातमध्यात कधीही नसतो. कधीही कोणावर टिका टिपन्नी सुध्दा करत नाही. शांतता व समजशील मार्गाने चालत असतो. त्यामुळे बाजीराव भैय्या धर्माधिकारी व केतकी चितळे यांच्यावरील कथित दाखल करण्यात आलेले गुन्हे तात्काळ मागे घ्यावेत या मागणीसाठी परळी येथील संपुर्ण ब्राह्मण समाजाचे परळी पोलीस ठाण्यात ठिय्या आंदोलन सुरु झाले असल्याचे दिसून येत आहे. सोबतच नुकत्याच पार पडलेल्या हिवाळी अधिवेशनात राज्याचे मुख्यमंत्री यांनी असंख्य मंत्रीमंडळासमोर परशुराम आर्थिक विकास महामंडळाची घोषणा केली होती. ती घोषणा आचारसंहिता लागण्यापुर्वी अंमलात आणून त्याच्यावर भरघोस निधी टाकावा तरच महाराष्ट्रातील सखल ब्राह्मण महासंघाला दिलासा मिळेल अशी मागणी महाराष्ट्र युनियन ऑफ जर्नालिस्ट चे मराठवाडा अध्यक्ष संजय सुपेकर यांनी केली आहे.

# पुण्यात ३६ व्या कथक महोत्सवास कलाकारांनी केला थरारक अविष्कार

## कलाकारांना प्रोत्साहन मिळणार -कुलगुरु पवार

## पुणेकरांचा भरभरुन प्रतिसाद -प्रणामी भगवती

## कथक च्या माध्यमातून कलेला वाव - डॉ. नंदकिशोर कपोते

## मराठवाड्यात कथक चे प्रोगाम राबवावे - संजय कुलकर्णी (सुपेकर)











**■पुणे , प्रतिनिधी**

केंद्र शासनाच्या वतीने दिल्ली आवृत्तीनंतर पुणे येथे २६ व २७ फेब्रुवारी २०२४ रोजी ३६ व्या कथक महोत्सवाचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमास संपुर्ण देशाच्या कानाकोप-यातून कथक चे कलाकार मर्मज्ञ, अभ्यासक आणि समिक्षकांचा या कार्यक्रमात सहभाग होता. कथक महोत्सव पुणे आवृत्ती, अमर दिग्गज सितारादेवी आणि संगीत नाटक पुरस्कार विजेते गुरुरोहिणी भाटे यांना समर्पित करण्यात आली. या कथक महोत्सवात महाराष्ट्रातील कलाकारांनी अव्वल बाजी मारली असून लवकरच पुढील कार्यक्रमाचे आयोजन केले जाणार असल्याची माहिती कथक केंद्र नवी दिल्लीच्या संचालक प्रणामी भगवती यांनी आमच्या प्रतिनिधीशी बोलताना सांगितले.

२६ व २७ फेब्रुवारी २०२४ रोजी कथक महोत्सवाच्या सकाळी टॉक शो आणि चर्चा सत्रातील नामवंत वक्ते कु. उमा डोगरा, कु. प्रणामी भगवती, कु. निलिमा अध्याये, कु. अमला शेखर, नंदकिशोर कपोते, कु. मनिषा साठे, कु. पार्वती दत्ता आणि कु. शमा भाटे आदि च्या उपस्थितीत पहिल्या कथक सत्राची सुरुवात करण्यात आली.

या टॉक शो मध्ये कथक क्वीन पद्मश्री सितारादेवी या नावाने प्रसिध्द असलेल्यांना हा कार्यक्रम समर्पित होता. तिने वयाच्या १२ व्या वर्षी महात्मा गांधीच्या समोर, सत्याग्रहाच्या काळात सावित्री सत्यवान नावाचे नृत्य दिग्दर्शन हि सादर केले. त्यात सु.श्री. जयंतीमाला यांनी पुढे हिन्दी चित्रपट सृष्टीतील दिग्गजांच्या सखोल योगदानाचा यावेळी प्रामुख्याने उल्लेख केला. कथक केंद्र सांस्कृतिक मंत्रालय भारत सरकार नवी दिल्ली यांच्या वतीने शनिवार, २६ फेब्रुवारी २०२४ रोजी पुणे येथील ज्योत्सना भोळे सभागृहात घेण्यात आलेल्या कथक फेस्टीवल ला रसिकांनी भरभरुन दाद दिली.

रविवार, २७ फेब्रुवारी २०२४ रोजी अण्णाभाऊ साठे सभागृहात युवा व जेष्ठ कलाकारांचे कथक नृत्याचे थरारक असे आविष्कार प्रेषकांना पहावयास मिळाले. याप्रसंगी म्हणून पद्मश्री प. सुरेश तळवळकर यांच्या हस्ते उद्घाटन करण्यात आले.

तर यावेळी प्रमुख अतिथी म्हणून पद्मश्री प. शेखर सेन, संगीत नाटक अकॅडमी पुरस्कार प्राप्त डॉ. नंदकिशोर कपोते, कथक केंद्राच्या प्रमुख अध्यक्षा उमा डोगरा, दिल्ली येथील कथक च्या संचालिका प्रणामी भगवती, पुणे येथील डी. वाय. पाटील विद्यापीठाचे कुलगुरु डॉ. एन. जे. पनवार, नागपुर येथील भाजपा चे प्रमुख प्रमोदकुमार खंदारे, महाराष्ट्र बेस्ट न्युज चे संचालक हिरामण आठवले, सु. श्री. उमा डोगरा, कु. प्रणामी भगवती, अमरावतीच्या डॉ. कविता चौधरी, परभणी येथील सखल ब्राम्हण महासंघाचे महाराष्ट्र प्रदेश प्रवक्ता तथा महाराष्ट्र युनियन ऑफ जर्नालिस्ट चे मराठवाडा अध्यक्ष संजय कुलकर्णी (सुपेकर) आदि मान्यवर उपस्थित होते. या कार्यक्रमात पुण्यातील कु. प्रेरणा आणि कु. इश्वरी देशपांडे या आई आणि मुलीने सामुहिक रित्या कथक थरारक नृत्य सादर करुन प्रेषकांची मने जिंकली. १४ बीट्स चे कालचक्र आणि कजारी सावरे जीओ या कथक नाट्यावर परफॉरमन्स देण्यात आला. इंदूरच्या सुचित्रा हरमलकर, रायगड घराण्याच्या सर्वात पारंपारिक आणि अनोख्या शैलीत तिने तिंतलमध्ये तिची चतुराई, फुट वर्क च्या जोरदार पुशसह सादरीकरण केले. लखनऊ येथील डॉ. कुमकुमधर यांच्या सामुहिक नृत्य दिग्दर्शनाने या कथक महोत्सवाची सांगता झाली. तिने पंचतत्व म्हणून पाच घटक ची भव्य संकल्पना मांडली. ५ सवार्कृष्ट घटकांचे विणकाम आणि ते मानवाभोवती कशा प्रतिक्रिया देतात हे सुंदरपणे प्रदेशित करते. त्यानंतर नरेशकुमार साद यांनी रचलेल्या एका सुंदर नजम ने संध्याकाळची फेरी झाली. ज्यात कथक च्या दरबारी संरेखनाचे चित्रण केले गेले. तेंतलच्या तांत्रिक बारकाव्यांचा यावेळी गौरव करण्यात आला. या संपुर्ण कथक च्या महोत्सवात कलाकारांनी केलेल्या आविष्कारातून प्रेषकांना अगदी मंत्रमुग्ध करण्यात आले. यावेळी व्यासपीठावरील सर्वच मान्यवरांनी आपले अमुल्य मार्गदर्शन केले. शेवटी या कार्यक्रमासाठी प्रत्यक्ष व अप्रत्यक्ष मदत करणा-यांचे कथक च्या दिल्ली येथील संचालिका प्रणामी भगवती यांनी सर्वांचे आभार मानले.

# ठाण्यात १६ मार्चला राहुल गांधींची न्याययात्रा

## गाडीतूनच नागरिकांना संबोधित करणार, माजी मंत्री बाळासाहेब थोरात यांच्याकडून जागेची पाहणी



- आपापसात यांची भांडण सुरू आहे, एक आमदार पोलीस ठाण्यात गोळीबार करतो. आमदार लोकांना मारत आहेत, आमदारांमध्ये विधानसभा पटांगणात धक्काबुक्की झाली ही दुर्दैवाची गोष्ट आहे. कोणताही कंट्रोल त्यांच्याकडे नाही.
- संयम सुटलेले सर्व लोक त्यांच्याकडे आहे. सरकारची प्रतिमा पूर्णपणे मलिन झाली आहे. असा आरोप थोरात यांनी केला. शिवसेना नेते रामदास कदम यांनी भाजपाला लगावलेल्या टोल्यावर.
- थोरात म्हणाले की तिघांमधील संघर्ष आता दिसून येतो. हा तर टेलर आहे. जस जशी निवडणूक जवळ येईल तसा सिनेमा आपल्याला पाहायला मिळणार आहे. असा दावा ही थोरात यांनी

**ठाणे** : काँग्रेस खासदार राहुल गांधी यांची न्याय यात्रा सुरू आहे. १२ तारखेला गुजरात नंतर नंदुरबार जिल्ह्यामध्ये ही यात्रा प्रवेश करेल. त्यानंतर धुळे, मालेगाव, नाशिक आणि वाडा भिवंडी मार्गाने त्यांचे ठाणे शहरात आगमन होणार आहे. ठाण्यात १६ मार्चला जांभळी नाका येथे सकाळी राहुल गांधी हे गाडीतूनच लोकांना संबोधण्यासाठी सभा घेतील. तेथून राहुल गांधी हे मुलुंड येथे थांबतील. १७ मार्चला दादर चैत्यभूमीला राहुल गांधी यांच्या यात्रेचा समारोप होईल. १७ तारखेलाच राहुल गांधीची मुंबई येथे सभा होईल. अशी माहिती माजी मंत्री आणि जेष्ठ काँग्रेस नेते बाळासाहेब थोरात यांनी शनिवारी पत्रकारांशी बोलतांना दिली. काँग्रेस नेते राहुल गांधी यांच्या नेतृत्वाखाली सुरू असलेली भारतजोडो न्याय यात्रा ही १६ मार्च रोजी ठाण्यातून जात आहे. त्याची पूर्व तयारी करण्याकरता शनिवार २ मार्च रोजी सकाळी माजी मंत्री बाळासाहेब थोरात हे ठाण्यातील शहर काँग्रेस मध्यवर्ती कार्यालय, येथे आले होते. यावेळी त्यांनी स्थानिक पदाधिकाऱ्याच्या बरोबर राहुल गांधी यांच्या यात्रेच्या मार्गाची पाहणी केली. त्यानंतर थोरात पत्रकारांशी संवाद साधला. देशामध्ये ज्या पद्धतीचे वातावरण सुरू आहे. त्यासाठी ही विशेष यात्रा आहे. असे बाळासाहेब थोरात म्हणाले.

२०१४ पासून पंतप्रधान म्हणून नरेंद्र मोदी कारभार करत आहे. पण आज देशा पुढे महागाईचा शेतकऱ्यांचे असे अनेक प्रश्न आहेत. लोकशाहीवर आघात होत आहे या सर्व गोष्टींवर न्याय मागणारी ही यात्रा आहे. असे थोरात म्हणाले. ज्या ठिकाणी अडचणी आहेत त्या ठिकाणी लक्ष देणे गरजेचे आहे, मोदी यांच्या अनेक सभा सुरू आहेत. मात्र मणिपूरमध्ये ते जाऊ शकले नाही, राजकारण आणि सत्ता डोळ्यासमोर ठेवून भारतीय जनता पक्षाची कार्यपद्धती दिसत आहे. असा टोला थोरात यांनी लगावला. राहुल गांधी यांच्या यात्रेमध्ये आणि जाहिर सभेमध्ये सहभागी होण्यासाठी महाविकास आघाडीतील मित्र पक्षांना आम्ही आमंत्रण दिले आहे. असेही थोरात यांनी सांगितले. भिवंडी लोकसभेच्या जागेसाठी शरद पवार यांची देखील मागणी आहे.

मात्र काँग्रेसची देखील मागणी असणार आहे, पहिली जागा काँग्रेसची या ठिकाणी होती. ती काँग्रेसलाच मिळाली पाहिजे अशी मागणी थोरात यांनी केली.

### विजयाची खात्री म्हणूनच भिवंडी लोकसभेवर दावा : थोरात

**भिवंडी**: भिवंडी लोकसभा निवडणूकीत काँग्रेस पक्षाचा उमेदवार हमखास विजयी होऊ शकतो म्हणून काँग्रेस पक्ष या जागेवर दावा करत असल्याची माहिती काँग्रेस पक्षाचे नेते माजी मंत्री बाळासाहेब थोरात यांनी दिली. खासदार राहुल गांधी यांची भारत जोडो न्याय यात्रा १२ मार्च रोजी महाराष्ट्रात नंदुरबार जिल्ह्यात प्रवेश करत आहे तेथून त्यांची यात्रा मुंबईच्या दिशेने जात असताना १५ मार्च रोजी त्यांचा मुक्काम भिवंडी येथे असणार आहे. या निमित्ताने मुंबई नाशिक महामार्गावरील भिवंडीतील सोनाळे गांव येथील सोनाळे क्रीडांगणाची पाहणी करण्याकरता बाळासाहेब थोरात आले होते. यावेळी युवक काँग्रेस प्रदेश सरचिटणीस विरेन दयानंद चोरघे, भिवंडी शहरध्यक्ष रशीद ताहीर मोमीन, तालुका अध्यक्ष विजय पाटील, पंकज गायकवाड, चेतन पवार यांचेसह काँग्रेस पदाधिकारी उपस्थित होते.

महाराष्ट्रातील लोकसभा निवडणूक जागा वाटप संदर्भात महाविकास आघाडीतील तिढा अद्याप सुटला नाही. तसेच भिवंडी लोकसभेची जागा कळीचा मुद्दा ठरत आहे. भिवंडी लोकसभेचा जागेवर राष्ट्रवादी काँग्रेस (पवार) यांनी दावा केला आहे याबद्दल त्यांना पत्रकारांनी विचारले असता भिवंडीची जागा काँग्रेस पक्ष लढविणार आहे.

## भिवंडीत १६ लाखांचा ३७ किलो गांजा जप्त; गुन्हे शाखेची धडक कारवाई

**भिवंडी**: भिवंडी शहरातीलअंजुरफाटा खारबाव रस्त्यावर गुन्हे शाखेचे पोलीस उपाआयुक्त शिवराज पाटील यांच्या आदेशानुसार भिवंडी गुन्हे शाखेच्या पोलिसांनी केलेल्या धाडसी कारवाईत दोघा जणांना ताब्यात घेत त्यांच्या जवळून सुमारे १६ लाखांचा ३७ किलो गांजा जप्त करण्यात पोलिसांना यश आले आहे. याप्रकरणी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करून संबंधित आरोपींना अटक करण्यात आली आहे. दरम्यान न्यायालयात हजर केले असता संबंधित आरोपींना ६ मार्च पर्यंत पोलीस कोठडी सुनावण्यात आली आहे भिवंडी गुन्हे शाखेतील पोलिसांना गोपनीय माहिती मिळाली की परराज्यातून दोन व्यक्ती गांजा विक्रीसाठी येणार आहेत. त्यामुळे गुन्हे शाखेचे वपोनि सचिन गायकवाड, ए.के.आफळे यांच्या मार्गदर्शनाखाली सपोनि धनराज केदार, सपोनि श्रीराज माळी यांच्या पोलिस पथकाने भिवंडी अंजुरफाटा - वसई महामार्गावरील कालवार गांव परिसरातील गुंजन ढाबा येथे सापळा रचला असता दोघे संशयित त्याठिकाणी आले. पोलिसांनी त्यांना ताब्यात घेऊन झडती घेतली असता त्यांच्या जवळ सुमारे १६ लाख ६८ हजार ५०४ रुपये किमतीचा ३७ किलो ३९४ ग्रॅम वजनाचा गांजा हा विक्रीकरता बाळगला असल्याचे आढळून आले.

## केडीएमसीतर्फे पल्स पोलिओ

**कल्याण** : कल्याण - डोंबिवली महापालिकेतर्फे येत्या रविवारी ३ मार्च रोजी पल्स पोलिओ लसीकरण मोहिम राबविण्यात येणार आहे. त्यासाठी पालिका क्षेत्रातील ० ते ५ वर्षे वयाखालील सुमारे १ लाख ६६ हजार १७० बालकांना १३२० लसीकरण केंद्रांमार्फत मोफत पोलिओची लस पाजण्याची व्यवस्था करण्यात आली आहे. या दिवशी जी बालके बुथवर पोलिओचा डोस घेण्यासाठी येऊ शकणार नाही त्यांना पुढील ५ दिवसात त्यांच्या घरोघरी जाऊन लस पाजण्यात येणार आहे. त्यासाठी एकूण ७१६ लसीकरण चमू तैनात करण्यात येणार आहेत. मागील वेळेस १० डिसेंबर २०२३ दरम्यान पल्स पोलिओ लसीकरण मोहिमेतंर्गत १ लाख ७४ हजार ८५ बालकांना पोलिओ लस पाजण्यात आली होती.

## दुचाकीचोराकडून पोलीस कर्मचाऱ्यांवर हल्ला

### शासकीय कामात अडथळा आणल्या प्रकरणी गुन्हा

**मीरा रोड** : भाईंदर पोलीस ठाणे हद्दीत दुचाकी चोरास पकडण्यास गेलेल्या पोलीस कर्मचाऱ्यांवर हल्ला करून धक्काबुक्की करणाऱ्याविरोधात शासकीय कामात अडथळा आणल्या प्रकरणी गुन्हा दाखल केला आहे. अयोध्या मिश्रीलाल गुप्ता असे चोराचे नाव आहे.

भाईंदर पोलीस ठाण्याचे स्थानिक पोलीस गुन्हे प्रकटीकरण शाखेचे पोलीस कर्मचारी सुशीलकुमार पवार व सलमान पटवे यांनी बावन जिनालय जैन मंदिराच्या पाठीमागे असलेल्या इमारतीचे सीसीटीव्ही फुटेज चेक केले. त्यात एक १६ ते १७ वर्षे वयाचा मुलगा दिसला. संशय आला म्हणून त्याची खात्री करण्यासाठी पोलीस गल्ली नं. २, तिवारी देवलनगर, भाईदर (प.) येथे गेले. पोलीस आरोपीचा शोध घेत असतांना सीसीटीव्ही फुटेजमध्ये दिसला. अयोध्या मिश्रीलाल गुप्ता (३२) याला ताब्यात घेण्याच्या कामात अडथळा निर्माण करून शिवीगाळी केली. क्पोलीस कर्मचाऱ्यांची कॉलर पकडून धक्काबुक्की केली. मारहाण केली, तसेच दुसरा पोलीस कर्मचारी सलमान पटवे याला पोटात मारून धक्का देऊन सरकारी कामात अडथळा आणला. याप्रकरणी भाईंदर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

# मोखाड्यातील कुर्लोदवासीयांचा विजनवास येणार संपुष्टात

## बहुप्रतिक्षित पुलाचे काम सुरू ■ बिगर आदिवासी क्षेत्रांतर्गत विशेष बाब म्हणून मंजुरी

**खोडाळा** : मोखाड्यातील अतिदुर्गम कुर्लोद ग्रामपंचायतीमधील शेड्याचापाडा येथील सुरेखा भागडे या आदिवासी गर्भवती महिलेला नदीच्या प्रवाहातून ओंडक्यावर बसून रस्त्याचे दुसरे टोक गाठावे लागले होते. या घटनेचे राज्यभर तीव्र पडसाद उमटले होते. त्याची गंभीर दखल घेत सार्वजनिक बांधकाम तथा पालघर जिल्ह्याचे पालकमंत्री रवींद्र चव्हाण यांनी या पुलासाठी तातडीने तांत्रिक अडथळे दूर करत आर्थिक तरतूद केली. अखेर शनिवारी या पुलाचे काम प्रत्यक्ष सुरू झाले असून, लवकरच हा पूल रहदारीसाठी उपलब्ध होणार आहे.

पुलाचे भूमिपूजन जि. प. सदस्या कुसूम झोले, कुर्लोदचे सरपंच, उपसरपंच, सदस्य तसेच ग्रामस्थांच्या प्रमुख उपस्थितीत पार पडले. या वेळी सार्वजनिक बांधकाम विभागाचे उपअभियंता विशाल अहिरराव व इतर अधिकारी हेही उपस्थित होते. मोखाड्यातील कुर्लोद ग्रामपंचायतीमधील गारगई-पिंजाळ नदीपलीकडे वसलेल्या शेड्याचापाडा येथील सुरेखा लहू भागडे या आदिवासी गर्भवती महिलेला २५ जुलै २०२२ रोजी प्रसूती वेदना असह्य झाल्या होत्या. त्यामुळे तिला ग्रामस्थांच्या मदतीने ओंडक्यावर बसून नदी पार करावी लागली. या गंभीर घटनेचे तीव्र पडसाद उमटले होते. तत्कालीन परिस्थितीत



आ. रवींद्र चव्हाण यांनी या घटनेची सकारात्मक दखल घेतली व विविध तांत्रिक अडथळे सोडवत भाजप तालुका अध्यक्ष संतोष चोथे यांनी सातत्याने पाठपुरावा केल्यामुळे प्रत्यक्ष पुलाच्या कामाला सुरुवात झाली. परिसरातील ग्रामस्थांनी सुटकेचा निःश्वास सोडला आहे. जिल्हा प्रशासनानेही आदिवासींच्या मदतीसाठी तातडीने बोट उपलब्ध करून दिली होती. त्यामुळे तत्कालीन परिस्थितीत कुर्लोदमधील संपर्कहिन पाड्यांसाठी आणि आरोग्य कर्मचाऱ्यांसाठी ही बोट आरोग्यदूत बनली व कुर्लोद ग्रामपंचायतीमधील रायपाडा, आंबेपाडा, जांभुळपाडा, शेड्याचापाडा या नदीपलीकडे वसलेल्या गावांची आरोग्यसेवा सुकर झाली होती. तथापि विस्तीर्ण नदीपात्रावरील पुलाचा मूलभूत यक्षप्रश्न कुर्लोद आणि परिसरातील गावपाड्यातील ग्रामस्थांची कायम डोकेदुखी होती.

### अडथळ्यांच्या शर्यतीतून निघाली वाट

तत्कालीन आदिवासी विकासमंत्री स्व.विष्णू सवरा यांनी या पुलासाठी २ कोटी रुपयांचा निधी मंजूर केला होता. तथापि नदीपात्र मोठे असल्याने तब्बल ८ स्लॅबचा पूल येथे उभारण्याची गरज होती. त्यासाठी अपेक्षित निधीची अडचण व निकषांत बसत नसल्याने पुलाचा प्रस्ताव धूळखात पडून होता. तसेच रस्ता जिल्हा परिषदेंतर्गत असल्याने या नियमांत बदल करून मार्ग व पूल ५०५४-०४ या शीर्षाखाली बिगर आदिवासी क्षेत्रांतर्गत विशेष बाब म्हणून मंत्री चव्हाण यांनी मंजुरी मिळवून दिली आहे. त्यांच्या या लोकहितैषी निर्णयाचे स्वागत केले जात आहे.

## २८ पेक्षा जास्त गुन्हे नोंद असणाऱ्या दोन सराईत गुन्हेगारांना पोलिसांनी केले हद्दपार

**काशिमिरा, प्रतिनिधी** - काशिमिरा पोलीस ठाणे हद्दीतील दोन सराईत गुन्हेगार हद्दपार. अधिकमाहीती नुसार काशिमिरा पोलीस ठाणे अभिलेखावरील सराईत गुन्हेगार आरोपी विशाल रमेश राजभर वय-२० वर्षे याच्या विरोधात मिरा-भाईंदर, वसई- विरार पोलीस आयुक्तालय, बृहन्मुंबई पोलीस आयुक्तालय तसेच गुजरात राज्यातील वलसाड येथे जबरी चोरी, चोरी, फसवणूक व दुखापतीचे असे दखत्रपात्र - १८ व अदखतपात्र गुन्हे दाखल आहेत. त्याचप्रमाणे काशिमिरा पोलीस ठाणे हददीत राहणारा सराईत गुन्हेगार आरोपी मनोज भुजारत चव्हाण वय-३८ वर्षे याच्या विरोधात देखील काशिमिरा पोलीस ठाणे येथे मात्रमत्ता व शरीराविरुध्दचे असे एकूण - १० दखलपात्र व अदखत्रपात्र गुन्हे दाखल आहेत. वरील दोन्ही आरोपी यांच्याविरुध्द प्रतिबंधक कारवाई करून देखील त्यांच्या वर्तनात सुधारणा न होता ते वारंवार गुन्हे करीत असल्याने व त्याच्याबद्दल जनतेच्या मनात असुरक्षीततेची भावना निर्माण झाल्याने त्यांना काशिमिरा पोलीस ठाणे व आजुबाजूचे परिसरातून हददपार करणे आवश्यक होते. त्या अनुषंगाने सदर आरोपी यांचावर हददपारीची कारवाई करणे आवश्यक होते त्याबाबतचा अहवाल मा. पोलीस उप-आयुक्त, परिमंडळ-०१, मिरा-भाईंदर, वसई-विरार पोलीस आयुक्तालय यांना पाठविण्यात आला होता. त्यानुसार मा.पोलीस उप- आयुक्त, परिमंडळ-०१, मिरारोड - पुर्व यांनी आरोपी १) विशाल रमेश राजभर वय - २० वर्षे यास दि. २६/०२/२०२४ रोजी मुंबई शहर, मुंबई उपनगरे, ठाणे, पालघर, रायगड या जिल्हयातून २ वर्षाकरीता हददपार करण्यात आलेले आहे. तसेच आरोपी २) मनोज भुजारत चव्हाण वय - ३८ वर्षे यास दि.२९/०२/२०२४ रोजी मुंबई शहर, मुंबई उपनगरे, ठाणे, पालघर, रायगड या जिल्हयातून २ वर्षाकरीता हददपार करण्यात आलेले आहे. सदरची कामगिरी श्री. मधुकर पांडे, पोलीस आयुक्त, मि. भा-व. वि पोलीस आयुक्तालय, श्रीकांत पाठक, अपर पोलीस आयुक्त यांच्या मार्गदर्शनाखाली प्रकाश गायकवाड, पोलीस उप-आयुक्त, परिमंडळ-०१, विजयकुमार मराठे, सहा.पो. आयुक्त, मिरारोड विभाग, पोलीस निरीक्षक / कुमारगोरव धादवड, सध्या नेम- पेल्हार पोलीस ठाणे तसेच गुन्हे प्रकटीकरण पथकाचे सपोनि / योगेश काळे, पोउर्नि / शिवाजी खाडे, सपोउनि - अजय मांडोळे, पो. हवा. /

## चोरी करणाऱ्या सराईत गुन्हेगांरास पोलिसांनी केली अटक

**मिरारोड, प्रतिनिधी** - चोरीच्या गुन्हयातील सराईत आरोपीतास अटक मिरारोड पोलीस ठाणेच्या गुन्हे प्रकटीकरण पथकाची कामगीरी. मिळालेल्या माहीती नुसार मिरारोड पोलीस ठाणे कार्यक्षेत्रात राहणा-या श्रीमती प्रिती चंद्रकांत कारेकर वय ४४ वर्षे रा.बी/3?/२०२ प्लाझा विहार, शांतीपार्क शिवालरी गार्डन रेस्टॉरंट आणि बार मिरारोड पुर्व ता.जि.ठाणे यांच्या मालकीची टाटा एस (छोटा हत्ती) हा शिवाली गार्डन रेस्टॉरंट आणि बार येथे बिल्डींगच्या बाहेर सार्वजनिक रोडवर उभा असतांना आरोपी याने टेम्पो मधील ०३ बट-या, एक स्टीलचा कपाट असा एकुण ९७,०००/- रु किमतीचा मुद्देमाल चोरी करुन नेला याबाबत फिर्याद यांनी दिनांक ०१/०३/२०२४ दिलेल्या तक्रारीवरुन मिरारोड पोलीस ठाणे गुन्हा दाखल करण्यात आला होता. नमुद गुन्हा हा अनोळखी आरोपीने केला असल्याने तो उघड होण्याकरीता मा. वरीष्ठांना गुन्हे प्रकटीकरण पथकातील अधिकारी व अंमलदार यांना सुचना दिल्या. त्याप्रमाणे गुन्हे प्रकटीकरण पथकातील अधिकारी व अंमलदार यांनी गुन्हयाच्या घटनास्थळी भेट देवुन गोपनिय बातमीदारांकडुन मिळालेल्या माहिती च्या आधारे, सदरचा गुन्हा हा मिरा भाईंदर परिसरातील चोरी व घरफोडी चे गुन्हे करणारा सराईत आरोपी आरबाज ईस्माईल शाह वय.२४ वर्षे, रा. मकसुद चाळ, मुन्शी कंम्पाउड, काशिमिरा, मिरारोड पुर्व ता. जि. ठाणे याने केला असल्याची खात्रीशीर माहिती मिळाल्याने नमुद आरोपीचा शोध घेवुन त्यास अटक करण्यात आली असुन गुन्हयात चोरी केलेला १०० टक्के मुद्देमाल हस्तगत करण्यात आला आहे. आरोपी याच्यावर आयुक्तालयातील अभिल्लेखावर यापुर्वी एकुण ६ गुन्हे दाखल आहेत. सदरची कामगिरी श्री.प्रकाश गायकवाड, पोलीस उप आयुक्त, परिमंडळ ०१, मिरारोड पुर्व, डॉ. श्री. विजय मराठे, सहाय्यक पोलीस आयुक्त, मिरारोड विभाग यांच्या मार्गदर्शनाखाली मिरारोड पोलीस ठाणेचे वरीष्ठ पोलीस निरीक्षक श्री. चंद्रकांत सरोदे, पोलीस निरीक्षक श्री. राहुलकुमार पाटील (गुन्हे), गुन्हे प्रकटीकरण पथकाचे सपोनि / संतोष सांगवीकर, पोउपनि / किरण वंजारी, पोहवा / प्रफुल्ल महाकुलकर, बालाजी हरणे, परेश पाटील, पो. अमं. शंकर शेळ्के, अथर्व देवरे यांनी केलेली आहे.

## घरफोडी करण्याच्या तयारीत असणाऱ्या दोन आरोपींना पोलीसांनी पकडले रंगेहात

**मिरारोड, प्रतिनिधी**

घरफोडी करण्याच्या तयारीत असणाऱ्या इसमांना अटक. अधिकमाहीती नुसार दिनांक ०१/०३/२०२४ रोजी मिरारोड पोलीस ठाणे गुन्हे प्रकटीकरण पथकातील अधिकारी व अंमलदार मिरारोड पोलीस ठाणे कार्यक्षेत्रात गुन्हे प्रतिबंध गस्त करीत असतांना गोपनिय बातमीदाराकडुन मिळालेल्या माहितीच्या आधारे दोन संशयित इसमांना ताब्यात घेवुन त्यांची विचारपुस केली असता १) सागर दिपक सोनी वय. २२ वर्षे, रा. फिरस्ता काशमिरा फ्त्रायओव्हर ब्रिज खाली काशिमिरा नाका, मिरारोड पुर्वे ता. जि. ठाणे व २) अजय अनिता पटेल वय.२१ वर्षे रा. गल्ला नं. ०८, भरत कंम्पाऊंड झोपडपट्टी, मांडवी पाडा, काशिमिरा, मिरारोड पुर्व ता. जि. ठाणे असे त्यांनी आपली ओळख सांगितली तसेच त्यांच्या ताब्यात पोलीसांना एक लोखंडी हतोडा व एक लोखंडी छनी असे घरफोडी करीता वापरण्यात येणारे हत्यार मिळुन आले. नमुद आरोपी हे घरफोडी, चोरी गुन्हा करण्यासाठी एकत्र जमल्याचे निर्दशनास आले आहे. म्हणुन सदर इसमांनी घरफोडी, चोरी करण्याच्या उद्देशाने एकत्र येवुन सवयीने अशाप्रकारचे गुन्हे करीत असल्याने त्यांच्याविरोधात मिरारोड पोलीस ठाणे गुन्हा नोंद करुन अटक करण्यात आली आहे. आरोपी १) सागर दिपक सोनी वय २२ वर्षे याच्यावर यापुर्वी १) मिरारोड पोलीस ठाणे व २) भाइंदर पोलीस ठाणे असे २ गुन्हे नोंद आहेत. २) भाईंदर पोलीस तसेच आरोपी २) अजय अनिता पटेत्र वय २१ वर्षे याच्यावर १) मिरारोड पोलीस ठाणे येथे गुन्हे नोंद आहेत. सदरची कामगिरी श्री.प्रकाश गायकवाड, पोलीस उप आयुक्त, परिमंडळ ०१, मिरारोड पुर्व, डॉ. श्री. विजय मराठे, सहाय्यक पोलीस आयुक्त, मिरारोड विभाग यांच्या मार्गदर्शनाखाली मिरारोड पोलीस ठाणेचे वरीष्ठ पोलीस निरीक्षक श्री. चंद्रकांत सरोदे, पोलीस निरीक्षक श्री. राहुलकुमार पाटील (गुन्हे), गुन्हे प्रकटीकरण पथकाचे सपोनि / संतोष सांगवीकर, पोउपनि / किरण वंजारी, पोहवा / प्रफुल्ल महाकुलकर, बालाजी हरणे, परेश पाटील, पो. अमं. शंकर शेळ्के, अथर्व देवरे यांनी केलेली आहे.

## दोन जेष्ठ नागरीकांचा खुन करुन पळुन गेलेल्या आरोपीला पोलीसांनी घातल्या बेड्या

**पालघर, प्रतिनिधी**

दोन जेष्ठ नागरीकांचा खुन करुन पळुन गेलेल्या आरोपीला अटक करण्यात पालघर पोलीसांना यश. मिळालेल्या माहीतीनुसार दिनांक २९/०२/२०२४ रोजी फियादी अजित मुकुंद पाटील, वय - ५६ वर्षे, रा. मु. पो. मोठी कुडण, ता. जि. पालघर, यांचे वडील श्री. मुकुंद विठोबा पाटील, वय ९२ वर्षे, हे मोठे कुडण येथील त्यांचे चिकुच्या वाडीमध्ये फेरफटका मारण्यासाठी सायंकाळी ०६.३० वा. च्या पुर्वी गेले होते व ते अंधार पडला तरी घरी आले नाही म्हणुन त्यांचे चुलते भिमराव विठोबा पाटील, वय ८४ वर्षे, हे त्यांना पाहण्यासाठी गेले असता आरोपी किशोरकुमार जगनाथ मंडल वय ३० वर्षे रा. शिवाजीनगर, बोईसर ता. जि. पालघर मुळ रा. शब्दा, पोठिया जिल्हा कटिहार राज्य - बिहार याने अज्ञात कारणा वरुन त्याच्या कडील लोखंडी कुदळीने दोन्ही मयत यांच्या डोक्यावर वार करुन निघृणपणे जिवे ठार मारले याबाबत तारापुर पोलीस ठाणे येथे फोनद्वारे माहिती प्राप्त झालेली होती. सदरच्या माहितीचे गांभीर्य लक्षात घेऊन श्री. बाळासाहेब पाटील, पोलीस अधीक्षक, पालघर श्री. पंकज शिरसाट, अपर पोलीस अधीक्षक, पालघर, यांच्या आदेशान्वये व मार्गदर्शनाखाली, श्री. विकास नाईक, उप विभागीय पोल्लीस अधिकारी, बोईसर यांच्या मार्गदर्शनाखाली श्री. शिरीष पवार, पोलीस निरीक्षक, बोईसर पोलीस ठाणे, श्री. अनिल विभुते, पोलीस निरीक्षक, स्थानिक गुन्हे शाखा, पालघर, सपोनि / पाचपुते, प्रभारी अधिकारी, वाणगाव पोलीस ठाणे, सपोनि / सागर कावळे, प्रभारी अधिकारी, तारापुर पोलीस ठाणे असे तात्काळ घटनास्थळी हजर झाले व कुडण व आजुबाजुच्या गावातील स्थानिक ग्रामस्थ आणि पोलीस अशी वेगवेगळी पथके तयार करुन जंगल परीसरात आरोपीचा शोध घेण्यास सुरवात करण्यात आली. जंगलात बराच शोध घेवुन झाल्यावर तारापुर खाडीकडे शोध घेताना सपोनि / सतिश आस्वर, पोना/अंभिरे, पोअ/धानिवरे, पोअ/खेडकर, नेम.बोईसर पोलीस ठाणे, पोअं / राखोंडे, पोअं कुमटकर, आर. सी. पी पालघर, पोअं/ मोरे, पोअ/बजगुडे नेम. स्ट्रायकींग बोईसर व इतर १० ते १५ ग्रामस्थ यांच्या पथकास खाडीतुन एक इसम उडी मारुन पोहुन पल्लीकडे पळुन जाण्याचा प्रयत्न करीत जात असतांना दिसला. सपोनि / सतिश आस्वर, पोना/अंभिरे यांनी त्याच्या पाठोपाठ पाण्यात उडी मारुन त्यास इतर टिमचे सदस्य व ग्रामस्थ यांच्या मदतीने पाण्यातून बाहेर काढले. सदर इसमाच्या नाका तोंडात चिखल गेलेला होता व अंगावरही जखमा झालेल्या होत्या.



त्यामुळे त्यास पुढील उपचारासाठी प्राथमिक आरोग्य केंद्र, तारापुर येथे दाखल करण्यात करण्यात आले. सदर घटनेबाबत तारापुर पोलीस ठाणे दिनांक ०१/०३/२०२४ रोजी गुन्हा दाखल करण्यात आला असुन सदर आरोपी यास दिनांक ०२/०३/२०२४ रोजी सदर गुन्हयात अटक करण्यात आली आहे. सदर गुन्हयाचा तपास श्री विकास नाईक, उपविभागीय पोलीस अधिकारी, बोईसर हे करीत आहेत. सदरची कामगीरी ही श्री. बाळासाहेब पाटील, पोलीस अधीक्षक, पालघर, श्री. पंकज शिरसाठ, अपर पोलीस अधीक्षक, पालघर यांचे आदेशान्वये श्री. विकास नाईक, उपविभागीय पोलीस अधिकारी बोईसर विभाग यांच्या मार्गदर्शनाखाली श्री. शिरीष पवार, पोलीस निरीक्षक, बोईसर पोलीस ठाणे, श्री. अनिल विभुते, पोलीस निरीक्षक, स्थानिक गुन्हे शाखा, पालघर, सपोनि / सागर कावळे, प्रभारी अधिकारी, तारापुर पोलीस ठाणे, सपोनि / पाचपुते, प्रभारी अधिकारी, वाणगाव पोलीस ठाणे, सपोनि /सतिश आस्वर, नेम. बोईसर पोलीस ठाणे, पोना / अंभिरे, पोअ/धानिवरे, पोअ/ खेडकर नेम तारापुर पोलीस ठाणे, पोअँ/राखोडे, पोअं कुमटकर, पोअ/बागुल, पोअ/ वसेकर आर. सी.पी पालघर, पोअं/ मोरे, पोअं/ बजगुडे, पोअं/ चव्हाण, पोअ/ आरेकर, पोहवा / वाघ, सफौ दुसाने, सफौ. म्हसकर, पोअं पाटील / पोअं-केंद्रे बोईसर स्टायकींगचे अंमलदार यांनी यशस्वीरीत्या पार पाडली आहे.

# संपादकीय... उतारीचे पत्ते



संपादक
दिपक मोरेश्वर नाईक

लोकसभा निवडणुकीचे रणशिंग अखेर सर्वात आधी भारतीय जनता पक्षाने फुंकले असून, आपल्या पहिल्या १९५ उमेदवारांची यादी या पक्षाने जाहीर केली आहे. महाराष्ट्र, बिहार तसेच आंध्र प्रदेश या प्रतिष्ठेच्या राज्यांत वाटाघाटींचा घोळ सुरू असतानाच, भाजपने लोकसभा निवडणुकीच्या प्रश्नपत्रिकेतील सोप्या प्रश्नांची उत्तरे आधी सोडवून टाकली आहेत.

एका अथार्ने पहिली उतारी टाकली आहे. उत्तर प्रदेश, मध्यप्रदेश, गुजरात, पश्चिम बंगाल आदी १६ राज्यांत, जेथे प्रामुख्याने भाजपला स्वबळावर लढायचे आहे, तेथील हे उमेदवार आहेत. मात्र, तरीही या सोप्या प्रश्नांची उत्तरे देताना काही अवघड निर्णयही घेतले आहेत.

वाराणशीतून दस्तुरखुद्द पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि गुजरातेतील गांधीनगर मतदारसंघातून जाहीर झालेली केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांची उमेदवारी ही खरे तर बातमीच नाही. मात्र, संरक्षणमंत्री राजनाथसिंह यांच्या उमेदवारीबाबत अनिश्चिततेच्या पसरलेल्या वावड्यांवर पडदा टाकून त्यांना लखनौ या त्यांच्याच होम पीचवर पुन्हा लढावयाचे आहे.

या यादीवर धावती नजर टाकली तरी त्यातून भाजपने दोन महिन्यांवर येऊन ठेपलेल्या लोकसभा निवडणुकीचे स्क्रिप्टच लिहिल्याचे सामोरे येते. विकसित भारत @ २०४७ हा भाजपचा या निवडणुकीचा नारा आहे आणि या यादीत प्रामुख्याने विंध्य पर्वताच्या उत्तरेकडील राज्यांतील उमेदवार असल्याने अवघ्या दीड महिन्यांपूर्वी अयोध्येत झालेल्या रामलल्लाच्या प्राणप्रतिष्ठेचा बॅक ड्रॉपया यादीला आपोआपच लाभला आहे.

शिवाय, त्यास विकसित भारताच्या संकल्पनेची फोडणी देण्यासही पक्षश्रेष्ठी विसरलेले नाहीत. मोदी आणि शहा तसेच पक्षाध्यक्ष जे. पी. नड्डा यांनी ही यादी काळजीपूर्वक तयार केली असून, त्यात आपल्या विश्वासातील ३४ केंद्रीय मंत्र्यांचा आवर्जून समावेश करण्यात आला आहे.

शिवाय, मध्य प्रदेशात दणदणीत विजय मिळवूनही मुख्यमंत्रिपदी पुनश्च प्रतिष्ठापना न झाल्यामुळे नाराज असलेल्या शिवराजसिंह चौहान यांच्याबरोबरच विप्लबकुमार देव आणि सवार्नंद सोनोवाल या आणखी दोन माजी मुख्यमंत्र्यांनाही लोकसभेच्या रिंगणात उतरवण्यात आले आहे.

ही यादी म्हणजे खरे तर भाजपच्या नव्या-जुन्या पिढीतील नेत्यांचा एका अथार्ने मनोमीलन सोहळाच आहे! मोदी यांनी १० वर्षांपूर्वी पंतप्रधानपदाची सूत्रे हाती घेताच पंच्याहत्तरी पार केलेल्या नेत्यांना मार्गदर्शक मंडळात नेऊन बसवले होते. या पार्श्वभूमीवर १९५ उमेदवारांच्या या यादीतील ४७ टक्के उमेदवारांचे वय हे पन्नासपेक्षा कमी असेल, अशी दक्षता घेण्यात आली आहे. तर सामाजिक समतोल राखत, या यादीत २५ टक्क्यांहून अधिक म्हणजे ५७ उमेदवार हे ओबीसी समाजातील असतील, अशी काळजी घेण्यात आली आहे. या यादीकडे आणखी एका दृष्टिकोनातून बघता येते.

कोणाकोणाला स्थान मिळाले आहे, त्यापेक्षा कोणाला वेचून वगळले आहे, ते बघण्यासारखे आहे. मालेगाव बॉम्बस्फोटातील आरोपी प्रज्ञासिंह ठाकूर, दिल्लीचे माजी मुख्यमंत्री साहेबसिंग वर्मा यांचे चिरंजीव परवेश तसेच रमेश बिधुडी यांना या यादीत स्थान मिळवता आलेले नाही. त्यास अर्थातच त्यांनी केलेली वादग्रस्त तसेच समाजात द्वेष पसरवणारी वक्तव्ये कारणीभूत ठरल्याचे दिसते. प्रज्ञासिंह यांनी थेट महात्मा गांधींच्या मारेकऱ्याचे उदात्तीकरण केले होते, तर परवेश यांनी दिल्लीत भाजपचे सरकार असते, तर एका तासात मोर्चेकऱ्यांना उचलून फेकून देण्यात येईल , असे तारे एकदा तोडले. त्यानंतर २०२२ मध्ये तर त्यांनी मुस्लिम समाजावर बहिष्कार घालण्याचे आवाहन केले होते! रमेश बिधुडी यांनी अलीकडेच थेट संसदेत अमरोहाचे खासदार दनिश अली यांच्यावर अत्यंत घृणास्पद टीका केली होती. या तिघांना उमेदवारी नाकारताना भाजप श्रेष्ठींना बहुधा सब का साथ... या आपल्या घोषणेचे स्मरण झालेले दिसते! भाजपने विशेष काळजी घेतलेली दिसते, ती राजधानीतील सात मतदारसंघांबाबत. २०१९ मध्ये काँग्रेस तसेच आम आदमी पक्ष यांच्याशी झालेल्या तिहेरी लढतीत भाजपने या सातही जागा जिंकल्या होत्या.मात्र, यंदा काँग्रेस आणि आप यांच्यात समझोता झाला आहे. या पार्श्वभूमीवर भाजपने माजी मंत्री आणि चांदणी चौकाचे खासदार डॉ. हर्षवर्धन, मीनाक्षी लेखी यांना दिल्लीत पुन्हा उमेदवारी दिलेली नाही. मात्र, डॉ. हर्षवर्धन यांनी त्यानंतरच्या २४ तासांतच राजकारणनिवृत्तीचा निर्णय जाहीर करत, आपली नाराजी व्यक्त केली.

# आर्थिक वाढीचा ‘म्युच्युअल’ मार्ग



अर्थात बँकिंग उद्योगाची तुलना म्युच्युअल फंडांशी होऊ शकणार नाही. सर्व बँकांनी मिळून उद्योगधंद्यांना दिलेल्या एकूण कर्जाची रक्कम साधारणपणे २०० लाख कोटी रुपयांच्या घरात जाते, तर म्युच्युअल फंडांची ही मदत साधारणपणे २० लाख कोटी रुपये आहे. तरीदेखील काही बाबतीत म्युच्युअल फंड्स बँकांच्या उणीवा भरून काढतात. उदा. बँका काही कारणांसाठी कर्जे देऊ शकत नाहीत.उदा.जमीनखरेदी, इक्विटी, इतर कंपनी ताब्यात घेणे इत्यादी. म्युच्युअल फंड्स एखाद्या कंपनीला त्यांच्या खेळत्या भांडवलापासून ते दीर्घकालीन हायड्रो /रिन्यूएबल प्रकल्पापर्यंत सर्व मदत करू शकतात. म्युच्युअल फंड्स नुसते दुय्यम शेअर बाजारात खरेदी करीत नाहीत, तर कंपन्यांच्या प्राथमिक बाजारातील आयपीओंनाही मदत करतात. यामुळे प्राथमिक बाजार सक्षम होऊन अर्थव्यवस्थेला थेट मदत होते.दीर्घकाळची परकी गुंतवणूकदारांची मक्तेदारी म्युच्युअल फंडांनी मोडीत काढली आहे. म्युच्युअल फंडांकडे आज फक्त ह्यएसआयपीह्णद्वारा महिन्याला १८ हजार ८०० कोटी तर वषार्ला तब्बल दोन लाख २५ हजार कोटी रुपये येत आहेत. ही छोटी रक्कम अजिबात नाही, याचे कारण परकी गुंतवणूकदारांची एका वषार्ची विक्री इतकी असते. त्यामुळेच मागील दोन वर्षे परकी गुंतवणूकदार विक्री करीत असतांना सुद्धा शेअर बाजार स्थिर आणि वरच्या दिशेने आहे. यात विमाकंपन्या, भविष्यनिर्वाह निधी कंपन्या यांचाही वाटा आहे. सक्षम शेअर बाजार हा कायम विविध उद्योगधंद्यांना स्वस्त आणि मोठे भांडवल मिळवून देतो आणि अर्थव्यवस्थेला मजबूत बनवितो. म्युच्युअल फंड्स हे सामान्य गुंतवणूकदार आणि अर्थव्यवस्था यात एका पुलासारखे काम करतात. आर्थिक बाजारांत तरलता येण्यास मदत करतात. सरकारच्या निर्गुंतवणूक कार्यक्रमाला हातभार लावतात.

सामाजिक बदल

म्युच्युअल फंड हा कोणता एक मालमत्ताविभाग नाही. सोने, चांदी, रियल इस्टेट, रोखे आणि देशातील तसेच बाहेरील देशातील इक्विटी शेअर्स अशा सर्व प्रकारच्या मालमत्ताविभागात गुंतवणूक करण्याचा तो एक सोपा, कायदेशीर मार्ग आहे. मागील १० ते १२ वर्षात म्युच्युअल फंड उद्योगामध्ये गुंतवणूकदारांच्या हिताचे मोठे बदल घडले. निव्वळ मालमत्तामूल्याचे दोन प्रकार आले.

मध्यस्थांना मिळणारे अप-फ्रंट कमिशन बंद झाले. खर्चाचे प्रमाण कमी झाले. सामाजिक कार्यासाठी, कर्करुग्णांना मदत करणे, झाडे लावणे यांसारख्या संकल्पित योजनांना सेबी ने मुभा दिली. फंड व्यवस्थापकांना ते सांभाळत असलेल्या योजनेत स्वतःचे पैसे गुंतविण्याचे बंधन आले, इत्यादी. सामाजिक बदलांमध्ये गुंतवणूकदार हळूहळू फिजिकल ते फायनान्शिअल अर्थात थेट सोने-चांदी आणि रीयल इस्टेट खरेदी न करता, म्युच्युअल फंडांकडे आकर्षित होतांना दिसत आहेत. त्याची प्रमुख कारणे खालीलप्रमाणे.

१. घसरते व्याजदरः मागील आठ ते दहा वर्षांत व्याजदर मोठ्या प्रमाणात खाली गेल्याने बँक, पोस्ट ऑफिस इत्यादी पारंपरिक गुंतवणूकपर्याय सुरक्षित असले तरीही अतिशय तुटपुंजा परतावा देतात. यामुळे गुंतवणूकदार थोडी जोखीम घ्यायला तयार दिसतात.

२. नोटबंदीः २०१६ मधील नोटबंदी म्युच्युअल फंडांच्या पथ्यावर पडली, याचे कारण म्युच्युअल फंड उद्योग गेली कित्येक वर्षे फक्त बँक खात्यामार्फतच व्यवहार करतो.

३. कोविडः २०२० मध्ये कोविडने बहुतेक सर्व उद्योगधंदे बंद पाडले; परंतु या काळात फक्त शेअर बाजार आणि म्युच्युअल फंड उद्योग सुरु होते, याचे कारण त्यांचे सर्व व्यवहार हे ऑनलाईन सहज होतात.

४. म्युच्युअल फंड सही है मोहीम उशिरा सुरु झाली तरीही त्याला प्रतिसाद चांगला मिळाला. अनेकांची त्याविषयीची भीती कमी झाली.

५. आकर्षक परतावाः मागील १, ३, ५ आणि १० वर्षात सर्व इक्विटी योजनांनी सकारात्मक परतावा दिला असून, सर्व विभागांनी कमीतकमी १० टक्के तर जास्तीतजास्त ६० टक्के असा घसघशीत परतावा दिला आहे; जो बँकांपेक्षा कितीतरी पटींनी जास्त आहे.

६. डिजिटलः मोबाईल एप द्वारा घरबसल्या गुंतवणूक करणे शक्य.

७. म्युच्युअल फंडाच्या स्वच्छ, पारदर्शक आणि सक्षम कामगिरीसाठी सेबी ही त्यांची नियामक संस्था त्यांच्यावर लक्ष ठेऊन असते आणि वेळोवेळी त्यांना मार्गदर्शन करते. प्रत्येक महिन्याला सर्व रोखे योजनांना एक स्ट्रेस टेस्ट पार करावी लागते. सेबीच्या उपायांनी हा उद्योग सक्षम होतांना दिसत आहे. कनिष्ठ आणि मध्यमउत्पन्न, विशेषतः पगारदार नोकरवर्ग यांचा म्युच्युअल फंड्समधील सहभाग मोठ्या प्रमाणात वाढतांना दिसत आहे.त्याची कारणे अशीः

१.जन-धन योजना : म्युच्युअल फंड रोख रक्कम कधीही स्वीकारत नाहीत. अनेक सामान्य लोकांचे बँक खातेच नसल्याने ते म्युच्युअल फंडांमध्ये गुंतवणूक करू शकत नव्हते. आज जन-धन योजनेद्वारा तब्बल ५० कोटी लोक बँकांना जोडली गेल्याने त्यांचा म्युच्युअल फंड गुंतवणुकीतील मार्ग मोकळा झाला आहे.

२. नोकरदार वगार्ला एसआयपी करणे सोपे जाते, याचे कारण महिन्याला त्यांच्या बँक खात्यात ठराविक रक्कम नक्की जमा होते. व्यवसाय करणाऱ्यांचे उत्पन्न निश्चित नसते. ज्यांचे उत्पन्न निश्चित नसते, अशा लोकांनी खरे तर एसटीपीचा फायदा घ्यायला हवा; परंतु आजही अनेक लोकांना ही संकल्पना माहिती नाही.

३. जोखीम क्षमता : बहुतेक उच्च उत्पन्नवर्ग अर्थात श्रीमंत गुंतवणूकदार पीएमएस तसेच एआयएफ यामध्ये गुंतवणूक करतांना दिसतात, याचे प्रमुख कारण म्हणजे उच्च उत्पन्न गुंतवणूकदारांची जोखीम घेण्याची क्षमता जास्त असते. परंतु दर वर्षी २० टक्क्यांनी वाढणाऱ्या या मालमत्तेमध्ये आजही काही ठराविक राज्य आणि शहरे, तसेच काही ठराविक बडे म्युच्युअल फंड्स यांची मक्तेदारी दिसून येते.

अँफीचे आकडे दाखवितात की, सर्व म्युच्युअल फंडांच्या एकूण मालमत्तेत महाराष्ट्र, गुजरात, कर्नाटक, पश्चिम बंगाल आणि एक केंद्रशासित प्रदेश दिल्ली यांचे प्रमाण हे जवळजवळ ७० टक्के आहेत. तसेच निम्मी मालमत्ता फक्त पाच शहरांमधून येते. अर्थात म्युच्युअल फंड अजूनही तळागाळापर्यंत पोहोचला नाही, हे मान्य केले पाहिजे. आज फक्त साडेचार कोटी गुंतवणूकदार म्युच्युअल फंडांमध्ये गुंतवणूक करतात. ज्यांचे साधारण १० कोटी फोलिओ आहेत.

एसआयपी लोकप्रिय असूनही फक्त नऊ कोटी एसआयपी आहेत. पहिल्या पाच बलाढ्य फंडांबरोबरीने इतर म्युच्युअल फंडांची मालमत्ता वाढणे अपेक्षित आणि सुरक्षित वाटते. फक्त डिजिटलवर अवलंबून न रहाता म्युच्युअल फंडांनी त्यांच्या शाखा, गाव-खेड्यांमध्ये सुरु करणे तसेच मध्यस्थांनी त्यांचे ज्ञान व सेवा श्रीमंतांपुरत्या मर्यादित न ठेवता, लहान गुंतवणूकदारांपर्यंत नेणे आवश्यक वाटते. अँफीने ठरविलेल्या उद्दिष्टानुसार म्युच्युअल फंडांची मालमत्ता २०३० पर्यंत १०० लाख कोटी रुपये होणे अपेक्षित आहे.

दर महिन्याला नवीन उचांक गाठणाऱ्या एसआयपी चा आकडा आणि वाढणारे बाजारमूल्यांकन पाहाता हा उद्योग तीन ते चार वर्षांत म्हणजे २०२८पर्यंतच हे उद्दिष्ट गाठेल, असे दिसते.

ठराविक शहरांत म्युच्युअल फंडांचे प्राबल्य

शहर - मालमत्ता टक्के
मुंबई - २७
दिल्ली - १३
बंगळूर - ५
पुणे - ४
कोलकत्ता - ४
पाच शहरांत एकूण - ५३

# शहापूरातील पाणीस्त्रोत पुनर्जीवित करण्याची गरज

## उपजिल्हा रुग्णालय परिसरात पाणी टंचाई असल्याने मागणी




◆शहापूर नगरपंचायतिला लेखी पत्र देऊन तशी मागणी देखील करण्यात आली आहे. या जिव्हाळ्याच्या गंभीर प्रश्नाकडे प्रशासनाने तत्काळ लक्ष देऊन ही विहीर पुनर्जीवित करावी अशी मागणी होत आहे. त्याचबरोबर येथे उघड्यावर पडलेल्या ड्रेनेज लाईन व गटार यांच्या दुरुस्तीसाठी सार्वजनिक बांधकाम विभागाला पत्रव्यवहार केल्याचे यावेळी डॉ.भंडारी यांनी सांगितले.



▮ **खर्डी**: ठाणे जिल्ह्यातील सर्वात मोठा आदिवासी बहुल तालुका म्हणून शहापूर तालुक्याची ओळख आहे. सह्याद्रीच्या डोंगर दऱ्यांमध्ये विखुरलेल्या या तालुक्यात बहुसंख्य आदिवासी बांधवांचे वास्तव्य आहे. येथील गोरगरीब रुग्णांसाठी आधारवड ठरणारे १०० बेडचे सुसज्ज अशा शहापुर उपजिल्हा रुग्णालयात पाण्याची कमतरता अनेक वर्षांपासून भेडसावत आहे. यामुळे स्वच्छतेचा प्रश्न अद्यापही ऐरणीवर आहेच पिण्याचे पाणी देखील मुबलक प्रमाणात नसल्याने रुग्णांना वेळेवर पाणी मिळत नाही. उपजिल्हा रुग्णालयाच्या कंपाउंड जवळ डॉ.बसवंत यांच्या क्लिनिक समोर नामशेष होण्याच्या मार्गावर असलेली जुन्या विहिरीचे पाणी स्त्रोत पुनर्जीवित केल्यास येथील पाण्याची समस्या कायमची मार्गी लागेल.असे उपजिल्हा रुग्णालयाचे अधिक्षक डॉ. प्रसाद भंडारी यांनी प्रस्तुत प्रतिनिधींशी बोलतांना सांगितले.

सध्या उपजिल्हा रुग्णालयाच्या प्रांगणात लाखो रुपये खर्च करून दुमजली स्वच्छता गृह उभारले आहे. मात्र पाणी आणि जाण्याचा रस्ता या दोन मुख्य कारणाने ते देखील ओस पडले आहे. उपजिल्हा रुग्णालयातील रुग्ण व त्यांचे नातेवाईक यांना देखील त्याच फारसा उपयोग होत नाही. अधिक्षक डॉ. प्रसाद भंडारी यांच्या पाठपुराव्याने शहापूर नगरपंचायतीकडून शहापूर शहरातील एका विहिरीमधून सध्या पाईप लाईन जोडण्यात आली आहे. त्या विहिरीचे पाणी देखील शहापूर उपजिल्हा रुग्णालयाला देण्यात येणार आहे. येत्या काही दिवसात हा पाणीपुरवठा सुरु होण्याच्या मार्गावर आहे. मात्र पाण्याच्या आवश्यकतेनुसार हे पाणी उपजिल्हा रुग्णालयाला पुरेसे पडणार नाही. त्यामुळे येथे जवळच असलेली नामशेष होण्याच्या मार्गावर असलेली विहीर पुनर्जीवित केल्यास उपजिल्हा रुग्णालयाला पाण्याची कमतरता जाणवणार नाही.

# रोजगार हमी योजनेतून युद्ध पातळीवर कामे सुरू



▮ **मुरबाड** : मुरबाड तालुक्यातील ग्रामीण तसेच आदिवासी व मुरबाड शहर परिसरात महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना अंतर्गत पंचायत समिती मुरबाड मार्फत जवळपास १०८१ कामे युद्ध पातळीवर सुरू आहेत. ही कामे ही मुरबाड पंचायत समिती गटविकास अधिकारी श्वेता पालवे यांच्या मार्गदर्शनाखाली सुरू आहेत. आतापर्यंत अकुशल कामावर १ कोटी ८० लाख ५६ हजार ३८० रुपये तर कुशल कामावर १ कोटी ३९ लाख ६२ हजार ६९३ असे मिळून ३कोटी २० लाख १९हजार ०७३ रुपये खर्च करण्यात आला आहे अशी माहिती मुरबाड पंचायत समिती विभागाने दिली आहे.कामावर आत्तापर्यंत ३३६० मस्टर्स काढण्यात आले असून १ एप्रिल २०२३ पासून ६४९४४ एवढी मनुष्यदिन निर्मिती झाली आहे. तर चालू आठवड्यात ८५ कामे सुरू असून १९८५ मनुष्यदिन निर्मिती झाली आहे. यामध्ये सिंचन विहिरी, फळबाग लागवड,गोठा शेड, पोल्ट्री शेड, घरकुल, रस्ते इत्यादी कामे सुरू आहेत. परंतु शासनाचा मजुरीचा दर २७३ एवढा आहे.मुरबाड तालुक्यातील काही मजूर शासनाचा कमी दर असल्यामुळे जुन्नर, आळे फाटा, मंचर, भिवंडी, कल्याण या ठिकाणी जाऊन मजुरी करतात. कारण तिथे खाजगी कामे करून मजूरांना पाचशे रुपयाचा दर मिळत असल्याने मजूरदार आपला कुटुंबाचा उदरनिर्वाह करत आहे.

# शहापूरात राष्ट्रवादीचे बहुजन जुडेगा, देश बढेगा अभियान

▮ **खर्डी**: शहापुरात राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी शरदचंद्र पवार ओबीसी सेल महाराष्ट्र प्रदेशच्या वतीने आज शहापूर येथे ,बहुजन जुडेगा देश बढेगा हा नारा देत बाईक रॅलीचे आयोजन करण्यात आले होते. महाराष्ट्र ओबीसी सेलचे प्रदेशाध्यक्ष राज राजापूरकर यांच्या अध्यक्षतेखाली साई मंदिर (चेरपोली) ते पार्थ सारथी पेट्रोल पंप पर्यंत रॅलीचे आयोजन केले होते. तर या रॅलीत माजी आमदार पांडुरंग बरोरा, ठाणे-पालघर विभागीय अध्यक्षा विद्या वेखंडे, कृषी व पशुसंवर्धन सभापती संजय निमसे, तालुकाध्यक्ष मनोज विशे, सामाजिक न्याय जिल्हाध्यक्ष अविनाश थोरात, ओबीसी सेल ठाणे जिल्हाध्यक्ष मुकेश पाटील, जिल्हाउपाध्यक्ष रविशेठ पाटील, ओबीसी सेल अध्यक्ष गुरुनाथ निमसे, जेष्ठ नेते डी.के.विशे, मुरबाड तालुका युवक कार्याध्यक्ष अविनाश भोईर, असिफ खालफिया, सुधीर जगे, भास्कर बरोरा, रामकृष्ण निचिते आदी मान्यवर सहभागी झाले होते.

**Receipt No. 1565847/2024/MBMC-IT (Computer No. 1565847)**

**MIRA BHAINDAR MUNICIPAL CORPORATION**
INFORMATION AND TECHNOLOGY DEPARTMENT
Indira Gandhi Bhavan, Chatrapati Shivaji Maharaj Marg, Bhayandar (W) 401101,
Tal. Dist. Thane 401101
Website – www.mbmc.gov.in E-mail – it@mbmc.gov.in Telephone No. - 28192828-251

MBMC/IT/568/2023-24 Date – 29/02/2024

**//First Extension Tender Notice //**

Mira Bhaindar Municipal Corporation invites Online tender (2024_MBMC_1014857_1) to participate in the competitive bidding To process to AMC Comprehensive Annual Maintenance Contract (AMC) for Computers, LAN & Servers and Facility Management Services in MBMC no. MBMC/P.R.O./E-1518482/2023-24 dated 22/02/2024. But due to less response we extend the tender till 06/03/2024 1.00 p.m. The tender form and other relevant document will be available for download on MBMC's E-tendering website https://mahatenders.gov.in. If possible the tenders will be opened in the presence of the bidders of their representative on Dt. 07/03/2024 at 1.00 p.m. at the tender cell of Mira Bhaindar Municipal Corporation.

Ref No. MBMC/PRO/E-1565847/2023-24

Date – 2/03/2024

Sign/-
(Sanjay Shinde)
Deputy Commissioner
(Information and Technology)
Mira Bhaindar Municipal Corporation

पोलीस बातमी पत्र



## रिकाम्या पोटी तुपाचे सेवन करणे फायदेशीर

**वजन** वाढायला लागले की, आपला आहार नियंत्रित करून ते कसे कमी करावे याबद्दल अनेक जण अनेक सल्ले देत असतात. सर्वात प्रामुख्याने सल्ला दिला जातो, तो तूप न खाण्याचा. त्याचबरोबर सकाळी रिकाम्या पोटी कोमट पाणी, त्यामध्ये मध आणि लिंबू घालून पिणे हा आणि असे अनेक सल्ले दिले जातात. या उपायांनी वजन कमी होते, पण जर आपल्या आहारात आपण वर्ज्य केलेल्या तुपाचा समावेश केला, तर त्याचे अनेक फायदे आपल्या आरोग्याला होऊ शकतात. पण त्याचबरोबर तूप किती खावे आणि कसे खावे याचाही विचार होणे आवश्यक आहे. आयुर्वेदामध्ये सांगितल्याप्रमाणे दररोज सकाळी उठल्याबरोबर इतर काहीही न खाता रिकाम्या पोटी तुपाचे सेवन केल्याने त्याचे अनेक फायदे आपल्या शरीराला मिळतात. यासाठी सकाळी एक ग्लास कोमट पाण्याबरोबर एक चमचा तुपाचे सेवन करावे. त्यानंतर अर्धा तास काहीही खाऊ नये. रिकाम्या पोटी तूप घेतल्याने त्वचेचे आरोग्य सुधारते. त्वचेचा कोरडेपणा नाहीसा होऊन त्वचा मुलायम, नितळ दिसू लागते. तुपामुळे त्वचेला आर्द्रता मिळत असल्याने रुक्ष झालेली त्वचा मृदू होते. सोरायसिससारखे त्वचेचे विकार असणाऱ्यांनी या उपायाचा अवलंब अवश्य करण्याचा प्रयत्न करावा. तुपाच्या सेवनाने सांध्याची दुखणी बरी होण्यास मदत होते. तुपामध्ये असलेली ओमेगा ३ फॅटी ॲसिड्स हाडांचे आरोग्य सुधारण्यास मदत करत असून, रिकाम्या पोटी केल्या गेलेल्या तुपाच्या सेवनाने ऑस्टियोपोरोसिससारखे आजार बरे होण्यास मदत होते.



# तुमचे केस, तुमच्या आरोग्याचा आरसा

**केस** गळणे आणि त्याजागी नवीन केस येणे ही प्रक्रिया नैसर्गिक आहे. त्यामुळे दररोज ऐंशी ते शंभर केस गळणे ही सामान्य बाब आहे. पण केसगळती जेव्हा यापेक्षा जास्त होऊ लागते, तेव्हा शरीरामध्ये असणाऱ्या कोणत्या तरी कमतरतेमुळे केस गळत असण्याची शक्यता नाकारता येत नाही. यामागे अनेक तऱ्हेची कारणे असू शकतात.

आनुवंशिकता, एखादा आजार, शरीरामध्ये असणारी लोहाची कमतरता, मानसिक किंवा शारीरिक तणाव, किंवा हवामानातील बदलामुळेही केस प्रमाणाबाहेर गळू शकतात. थायरॉइडच्या असंतुलनामुळेही केस गळू शकतात. तसेच प्रसूतीनंतरही महिलांमध्ये केसगळतीचे प्रमाण वाढते. ही केसगळती रोखण्यासाठी शरीराला लोहाची आवश्यकता असते. शरीरामध्ये हिमोग्लोबिन सामान्य असले, तरी लोहाची कमतरता असू शकते. अनेकदा शरीराला प्रथिनांचे पोषण न मिळाल्यामुळे देखील केसगळती उद्भवू शकते. त्यामुळे जर मोठ्या प्रमाणावर केसगळती होत असेल, तर रक्ताची तपासणी करून घेऊन शरीरामध्ये कोणत्या पोषक घटकाची कमतरता आहे, हे समजून घेता येते, तसेच आहारतज्ज्ञांचा सल्ला घेऊन आपल्या आहारामध्ये सुधारणा करून घेऊन शरीराला आवश्यक ते पोषण मिळेल याची काळजी घेता येऊ शकते.

जर दाट असलेले केस पातळ होत चालले असतील, तर तुमची जीवनशैली याला जबाबदार असू शकते. वारंवार केसांवर केल्या जाणाऱ्या रासायनिक ट्रीटमेंट, केसांची अपुरी निगा, हॉर्मोन्सचे असंतुलन आणि पोषणाची कमतरता या कारणांमुळे केस पातळ होऊ लागतात. वाढत्या वयानिशी देखील केसांचा दाटपणा कमी होत जातो. केस पातळ होण्यामागे नक्की कोणते कारण असू शकेल हे जाणून घेण्याकरिता अनेक प्रकारच्या तपासण्या उपलब्ध आहेत. एकदा कारण स्पष्ट झाले की मग त्यावर उपाययोजना करणे शक्य होते.

तुमच्या केसांवरून तुमचे आरोग्य कसे आहे याचा अंदाज बांधता येऊ शकतो. केस गळणे किंवा केस पातळ होणे हे मोठ्या समस्येचे सूचक असू शकते. तज्ज्ञांच्या मते तुमच्या केसांची स्थिती तुमच्या आरोग्याबद्दल बरेच काही सांगू शकते. कारण आपल्या केसांतील 'मायक्रोसर्क्युलेशन' आपल्या शरीरातील हॉर्मोन्सच्या संतुलनावर आणि शरीराला मिळणाऱ्या पोषणावर अवलंबून असते. आपले केस, अगदी सूक्ष्म प्रमाणात का होईना, पण आपल्या शरीरातील कमतरता दर्शवत असतात.





जर डोक्यात सतत खाज येत असेल किंवा स्काल्प सतत खपल्या धरल्याप्रमाणे दिसत असेल, तर हे लक्षण सीबम कमी होत असल्याचे आहे. हे लक्षण एक्झिमा किंवा सोरायसिसचे देखील असू शकते. सततचा मानसिक तणाव, शारीरिक थकवा, किंवा हेअर प्रोडक्ट्सचा अतिवापर यामुळे ही समस्या उद्भवू शकते. शरीरामध्ये लोहाची कमतरता असल्यासही डोके खाजणे, स्काल्पवर खपल्या धरणे अशा तक्रारी उद्भवू शकतात. याकरिता तज्ज्ञांच्या सल्ला घेणे, व त्याप्रमाणे औषधोपचार करणे आवश्यक आहे.

जर केसांमध्ये स्प्लीट एन्ड्स होत असतील, म्हणजेच केस जर टोकाशी दुभंगत असतील, तर हे रोखण्याकरिताही उपचारांची गरज आहे. केस दुभंगण्याची अनेक करणे असू शकतात. हेअर स्टायलिंग करताना हीट प्रोटेक्टंटचा वापर न करता हीट ट्रीटमेंट करणे, ब्लो ड्रायरचा अतिवापर, केसांमध्ये आर्द्रतेची कमतरता, यामुळे केस टोकांशी दुभंगताना आढळतात.

## मेंदी वापरण्याचे फायदे व तोटे

**मेंदी** केसांच्या मुळांना मजबूत बनवते. मेंदीमध्ये मेथीदाण्याची पूड मिसळून हे मिश्रण केसांना लावल्यास केसगळती कमी होते. मेंदीच्या वापरामुळे केस चमकदार, मुलायम होतात. मेंदी नैसर्गिक हेअर कंडिशनर आहे. केसांचे कंडिशनिंग करण्यासाठी मेंदीमध्ये अंडे किंवा दही घालून हे मिश्रण केसांना लावावे. अर्ध्या तासाने कोमट पाण्याने केस धुवून टाकावेत. मेंदीच्या वापराने केसांमधील कोंडा कमी होण्यास मदत होते. मेंदीच्या नियमित वापराने केसांमधील कोंडा गायब होईलच, शिवाय पुन्हा होणारही नाही. मेंदीमध्ये असणारी अँटी फंगल आणि अँटी मायक्रोबियल तत्त्वे डोक्याची खाज कमी करण्यास मदत करतात. मेंदीचा सर्वसामान्य उपयोग केसांना डाय करण्यासाठी केला जातो. बाजारातील रसायनमिश्रित हेअर डाय वापरण्यापेक्षा मेंदीचा वापर हा सुरक्षित पर्याय आहे. मेंदीमध्ये असलेले टॅनिन केसांच्या कॉर्टेक्समध्ये शिरून केसांना मजबूत बनवते आणि केस मुलायम व चमकदार दिसू लागतात. तसेच केसांचा तेलकटपणा नियंत्रित ठेवण्यासही मेंदी उपयुक्त आहे. मेंदी वापरण्याचे जसे अनेक फायदे आहेत, तसेच काही तोटे देखील आहेत. मेंदीच्या अतिवापराने केस राठ, कोरडे होऊ शकतात. त्यामुळे मेंदीचा वापर करण्याआधी आणि केल्यानंतर केसांना भरपूर तेल लावावे. तेल केसांमध्ये थोडा वेळ राहू देऊन मग कोमट पाण्याने केस धुवावेत. आजकाल बाजारामध्ये निरनिराळ्या ब्रँड्सच्या मेंदी उपलब्ध असतात.

केसांशी निगडित समस्यांवर उपाय म्हणून मेंदी वापरण्याची पद्धत आपल्याकडे फार पूर्वीपासून चालत आली आहे. अगदी आजीपासून ते तरुण नातीपर्यंत सर्वच मुली आणि आता मुलेही केसांच्या आरोग्यासाठी मेंदीचा वापर करणे पसंत करताना दिसतात. मेंदी वापरल्याने केसांवर रंग तर चढतोच, पण त्याशिवाय मेंदीमध्ये असलेली अनेक पोषक तत्त्वे केसांचे आरोग्य सुधारण्यास मदत करतात. पूर्वीच्या काळी, आणि अजूनही काही ठिकाणी मेंदीच्या झाडांची पाने वाटून तो लेप केसांना लावण्याची पद्धत आहे. पण आजकाल मेंदीची पाने वाळवून त्यापासून तयार केलेली मेंदी पावडर बाजारामध्ये सहज उपलब्ध असते. ही मेंदी वापरण्याचे जसे फायदे आहेत, तसेच त्यापासून काही प्रमाणात नुकसानही होऊ शकते.





# ब्लड शुगर वाढली हे कसे ओळखाल?

ब्लड शुगर लेव्हल वाढणे, म्हणजेच हायपरग्लायसिमिया. हा अमेरिकेमध्ये 'सायलेंट किलर' म्हणून ओळखला जाणारा विकार आहे. भारतामध्ये ही डायबिटिस या विकाराने ग्रस्त असणाऱ्या लोकांचे प्रमाण दिवसेंदिवस वाढत आहे. मानसिक तणाव, व्यायामाचा अभाव किंवा इतर काही विकारांमुळे ब्लड शुगर लेव्हल वाढताना आढळते. या अवस्थेचे वेळेवर निदान केले गेले नाही, तर रुग्णाच्या जीवाला धोका निर्माण होऊ शकतो.

शुगर लेव्हल वाढण्यासाठी, तुम्ही त्यापूर्वीच्या काही तासांमध्ये काय खाल्ले आहे, हे पाहणे अतिशय महत्त्वाचे ठरते. ब्लड शुगर लेव्हल वाढल्याने शरीरातील पेशी आणि अवयवांना धोका निर्माण होऊ शकतो. त्यामुळे एखाद्या व्यक्तीची ब्लड शुगर लेव्हल सतत वाढत असेल, तर त्याने तातडीने डॉक्टरांचा सल्ला घेणे अतिशय महत्त्वाचे आहे. ब्लड शुगर लेव्हल सरासरी पातळीपेक्षा अधिक वाढली आहे हे दाखवून देणारी काही लक्षणे शरीरामध्ये निर्माण होतात. ही लक्षणे दिसून आली, तर त्वरित डॉक्टरांचा सल्ला घ्यावा.

तोंड कोरडे पडत असून, सतत तहान लागणे हे ब्लड शुगर वाढल्याचे लक्षण असू शकते. अशा वेळी रुग्णाच्या तोंडाला सतत कोरड पडते. कितीही पाणी प्यायले तरी तहान भागत नाही. अशा वेळी खूप जास्त पाणी प्यायले जाते आणि परिणामी सतत लघवीला जावे लागते. खूप पाणी प्यायल्याने खरे तर लघवीचा रंग शुभ्र असायला हवा. पण ब्लड शुगर वाढली असल्यास कितीही पाणी प्यायले तरी लघवीचा रंग गडद दिसतो. अशा वेळी ब्लड शुगर वाढली आहे हे ओळखून त्वरित डॉक्टरांचा सल्ला घ्यावा. ब्लड शुगर जर वाढली असेल, तर दृष्टी काहीशी कमकुवत होऊ लागते. रुग्णाला थोडी लांब असलेली वस्तू स्पष्ट न दिसता, धूसर दिसू लागते. त्याचबरोबर हातपाय सतत गार पडू लागतात. तसेच हातापायांना सतत मुंग्या आल्याची भावना होते. हे लक्षण ही ब्लड शुगर वाढली असल्याचे दर्शवते.

ब्लड शुगर वाढली असल्यास रुग्ण सतत चिडचिड्या मनःस्थितीत असतो, तसेच त्याला सतत शारीरिक थकवा जाणवतो. कुठल्याही गोष्टीवर मन एकाग्र करणे त्याला जड जाते.





## ओपनफेस सँडविच

**तेच** तेच पदार्थ खाऊन कंटाळा येतो. खास करून मुलांच्या डब्यात काय पदार्थ द्यावे हे सुचत नाही. पोळीभाजी नको, पराठे खाऊन कंटाळा आला, सँडविच काय तेच तेच.. मग असे करायचे की हे पदार्थ वेगळ्या रूपात द्यायचे. आता सँडविच. नेहमीचे कसे असते, बटाटा, चटणी, काकडीबरोबर नाही का! मग सँडविचला वेगळे रूप द्यायचे. नेहमीचे सँडविच बंद असते, हे ओपनफेस ठेवायचे.



**साहित्य** – उकडलेला बटाटा, सिमला मिरची, गाजर, फरसबी, चाट मसाला, चिली फ्लेक्स, जिरे पूड, लसूण, मीठ, लिंबू, ब्रेड, चिझ किंवा बटर.

**कृती** – उकडलेला बटाटा किसून त्यात हवी तर सिमला मिरची, गाजर, फरसबी काहीही घाला. मात्र अत्यंत बारीक चिरून. आता यात हवा तो मसाला टाका. चाट मसाला, ड्राय हॅर्ब्स, चिली फ्लेक्स, जिरे पूड, लसूण, मीठ, लिंबू रस चांगले एकत्र केले की ब्रेडचे लांबट तुकडे करा. त्यावर हे मिश्रण थापा. वरून चीझ किसून घाला अथवा थोडे बटर घाला. साधारण ग्रील करा किंवा तव्यावर शेकवून द्या. हे सँडविच मेयो किंवा चटणीसोबत खायला द्या.

### वॅक्सिंगऐवजी शेव्हिंगचा पर्याय वापरत असाल तर या गोष्टी ठेवा लक्षात

# शरीरावर जाड केस येणे होईल नाहीसे

**आता लवकरच उन्हाळा सीझन सुरू होईल, समर वाइब्सनुसार आपणही शॉर्ट्स, क्युट ड्रेसेस घालून बाहेर पडण्याच्या विचारात असाल, अशावेळी पायावर जाड केस असले तर असे कपडे कसे घालू? असा प्रश्नही तुम्हाला साहजिक पडेलच. मग अगदी आयत्या वेळी पार्लरमध्ये जाण्याऐवजी आपण घरीच रेझर घेऊन शेव्हिंगचा पर्याय निवडाल, वास्तविक यात काही हरकत नाही, मात्र अनेकदा शेव्हिंगमुळे पुन्हा अंगावर येणारे केस हे नियमित लवेपेक्षा जाडसर येतात आणि पुढच्या वेळी हेच केस पुन्हा काढून टाकताना त्वचेला त्रास होतो. असं होऊ द्यायचं नसल्यास तुम्हाला शेव्हिंगवेळी फक्त काही सोप्प्या टिप्स लक्षात ठेवण्याची गरज आहे. अनेक महिलांना वॅक्सिंगमुळे त्रास होतो, तर हेअर रिमूव्हल क्रीम्समुळे त्वचा काळवंडते, असाही काहींचा अनुभव असतो, यावर पर्याय म्हणून रेझरचा वापर हा त्यातल्या त्यात सेफ म्हणता येईल. फक्त रेझर योग्य पद्धतीने वापरला जातोय का, याकडे लक्ष देणे गरजेचे आहे. ही योग्य पद्धत कोणती आणि शेव्हिंग करताना कोणत्या गोष्टी लक्षात ठेवावयाच्या, हे जाणून घ्या..**



कसा वापराल रेझर? रेझर फिरवताना ज्या दिशेने केस येतात त्या दिशेनेच फिरवा, यामुळे केस मुळासकट निघून जायला मदत होते आणि पुढील वेळेस जाड केस येत नाहीत. रेझर फिरवताना दुखापत होईल इतका जोर लावू नका. हात, पाय, अंडरआर्म्स, गुप्तांग अशा सर्वच ठिकाणी एकच रेझर वापरू नका. ब्लेड चेंज करणारे रेझर वापरत असाल तर एखादे ब्लेड तीन ते जास्तीत जास्त चार वेळा वापरा. त्यावर नको. शेव्हिंग प्रोसेस सोपी करतील असे मार्ग - जो भाग शेव्ह करायचा आहे तो पाण्याने भिजवा यामुळे केस नरम होतील.˘ हात किंवा पाय, अंडरआर्म्स, प्रायव्हेट पार्टवरील केस काढायचे असतील तरी आधी त्यावर कमी केमिकल्स असलेले शेव्हिंग फोम वापरा, मगच केसांवर रेझरचा वापर करा. यामुळे केस नरम होतात आणि पटकन निघून जातात.˘ शेव्हिंग केल्यानंतर तुमच्या त्वचेची छिद्रे उघडतात. त्यात धूळ जाऊ नये किंवा कोरडेपणा येऊ नये, रेडनेसचा त्रास होऊ नये म्हणून चांगले मॉइश्चरायझर त्वचेला लावा.˘ शेव्ह केल्यानंतर आधी तुम्ही तुमच्या अंडरआर्म्सला ॲलोवेरा जेल किंवा बर्फ लावा. बेबी पावडरने जळजळ होत असल्यास लगेच थांबते.



### मिठाई बनवताना साखरेऐवजी

# वापरा खजुराची पेस्ट

आपल्या दैनंदिन आहारामध्ये साखरेचा वापर होत असतो. चहा, कॉफी, आणि मुख्य म्हणजे आपल्या आहारातील बहुतेक सर्वच गोड पदार्थांमध्ये साखरेचा वापर नियमित केला जात असतो. केवळ घरी तयार करण्यात आलेल्या पदार्थांतच नव्हे, तर ब्रेड, बिस्किटे, तयार सॉसेस, सँडविच स्प्रेड्स, पॅकेज्ड फळांचे रस, कोल्ड ड्रिंक्स यांमध्येही साखरेचे प्रमाण जास्त असते. रिफाईन्ड साखर अतिप्रमाणात खाल्ल्याने आरोग्याला धोका निर्माण होत असून, तरुण वयातच उच्च रक्तदाब, मधुमेह, इत्यादी विकार उद्भवण्याचे प्रमाण वाढले आहे.

**आहारामध्ये** साखर जास्त असल्याने चेहऱ्यावर अकाली सुरकुत्या येणे, वारंवार मुरुमे, पुटकुळ्या येणे, इत्यादी लक्षणे दिसू लागतात. त्यामुळेच आहारतज्ज्ञ दैनंदिन आहारामधून साखरेचे प्रमाण कमी करून साखरेऐवजी नैसर्गिक स्वीटनर्स वापरण्याचा सल्ला देत असतात. नैसर्गिक स्वीटनर्समध्ये अनेक पर्याय उपलब्ध असून त्यामध्ये खजुराच्या पेस्टचा समावेश करता येऊ शकतो. खजुराची विशेषता अशी की त्यामध्ये नैसर्गिक शुगर्ससोबत प्रथिने, फायबर, झिंक, मॅग्नेशियम इत्यादी क्षारही आहेत. शंभर ग्रॅम खजुरामध्ये २८२ किलो कॅलरीज इतकी ऊर्जा असते. त्यामुळे खजुरापासून तयार केली गेलेली पेस्ट किंवा सिरप रिफाईन्ड साखरेऐवजी वापरली जाऊ शकते. खजुराची पेस्ट घरच्या घरी तयार करण्यासाठी केवळ खजूर आणि स्वच्छ पाणी, इतक्याच साहित्याची आवश्यकता आहे. खजुराची पेस्ट बनवण्यासाठी ताजा पिकलेला खजूर पाण्यामध्ये भिजवून ठेवावा. खजूर भिजवण्याआधी त्याच्यातील बिया काढून टाकाव्यात. त्यानंतर गरम पाण्यामध्ये खजूर भिजवावा. हा खजूर रात्रभर पाण्यामध्ये भिजू द्यायचा आहे.





दुसऱ्या दिवशी सकाळी खजूर पाण्यातून काढून घेऊन मिक्सरवर बारीक वाटावा. खजूर भिजवून ठेवलेले पाणी टाकून न देता हे पाणी खजूर मिक्सरवर वाटत असताना घालावे. आवश्यक तितके पाणी घालून आपल्याला हवी तितकी घट्ट किंवा पातळ पेस्ट तयार करून घ्यावी.

या पेस्टमध्ये किंचित मीठ, आवडत असल्यास मध, किंवा दालचिनीची पूड मिसळता येईल. यामुळे या पेस्टला वेगळीच चव येते. खजुराचे सिरप तयार करण्यासाठी खजूर पाण्यामध्ये उकळून घ्यावेत.

त्यानंतर खजूर उकळलेले पाणी गाळून घेऊन खजुराचा गर वेगळा करावा.

**मनुके खाण्यास जेवढे स्वादिष्ट आहेत, तेवढेच अन्य ड्रायफ्रुटच्या तुलनेत स्वस्त देखील आहेत. मनुक्यांचा वापर अनेकदा गोड पदार्थांमध्ये केला जातो. याचा स्वाद पदार्थाला चवदार बनवतो. याव्यतिरिक्त मनुके खाण्याचे अनेक फायदे आहेत. हे फायदे जाणून घेऊया...**

## जाणून घ्या फायदे मनुके खाण्याचे



**शरीराला ताकद मिळते –** दररोज मनुके खाल्ल्याने शरीराला ताकद मिळते. मनुक्यात नैसर्गिक साखर असते, जी सहज पचते. यामुळे शरीराला त्वरित ऊर्जा मिळते. मनुक्यात कोलेस्ट्रॉल नसते, ज्यामुळे हृदयाची समस्या असलेल्या रुग्णांसाठी हे चांगले आहे.

**बद्धकोष्ठता असणाऱ्यांसाठी फायदेशीर –** जर तुम्हाला बद्धकोष्ठता असेल तर मनुके खूपच फायदेशीर आहेत. बद्धकोष्ठतेची समस्या दूर करण्यासाठी मनुके एकप्रकारचे वरदान आहे. मनुक्यांना भिजवून खाल्ल्याने अधिक फायदा होतो.

**वजन कमी करण्यासाठी –** मनुक्यातील नैसर्गिक साखर तुमच्या शरीराला नुकसान पोहचवत नाही. यामुळे याचे नियमित सेवन केल्याने तुमचे वजन देखील कमी होते.

**हाडे मजबूत होतात –** हाडे मजबूत करायची असतील तर मनुक्यांचे सेवन नक्की करा.

# फोन चोरी झाल्यास अशा प्रकारे करा बँक डिटेल्स आणि मोबाईल वॉलेटचे रक्षण

**हल्ली** चोर तुमचा फोन मिळाल्यावर फक्त एकच गोष्ट शोधतात ते म्हणजे तुमचे बँक डिटेल्स. सध्या डिजिटल पेमेंट होत असल्यामुळे एकाच डिव्हाइसमध्ये वेगवेगळ्या ॲप्सचा समावेश असतो. स्मार्टफोन चोरण्यासाठी या डिजिटल वॉलेटपर्यंत पोहोचणं इतकं कठीण नाही. अशा अनेक वाईट घटना देखील घडल्या जिथे फोन चोरीला गेल्यावर बँक डिटेल्स मिळवून चोराने बँक अकाऊंट रिकामं केलं.

अशा प्रकारच्या धोक्यापासून वाचण्यासाठी काही गोष्टी लक्षात ठेवल्या पाहिजेत आणि फोन चोरीला गेल्यावर त्या केल्या पाहिजेत. जर तुमचा फोन हरवला किंवा चोरीला गेला तर तुम्ही पुढील पद्धती अवलंबून तुमच्या फोन किंवा त्यातील डेटाचा गैरवापर टाळू शकता.

**सिम कार्ड ब्लॉक करा**

फोन हरवल्यावर फोन नंबरचा गैरवापर टाळणं अत्यंत महत्त्वाचं आहे. सिम कार्ड ब्लॉक केल्यास फोनवरील प्रत्येक ते ॲप ब्लॉक करता येतात, जे ओटीपीच्या माध्यमातून ॲक्सेस केले जाऊ शकतात. तुम्ही नवीन सिम कार्डवर जुना नंबर मिळवू शकता. त्यासाठी काही वेळ लागू शकतो, परंतु तुमच्या प्रायव्हसीसाठी आणि मोबाईल वॉलेटच्या सुरक्षेसाठी सिम कार्ड ब्लॉक करणं अत्यंत आवश्यक आहे.

**मोबाईल बँकिंग सर्व्हिस बंद करा**

फोन चोर तुमचे बँक डिटेल्स सहज मिळवू शकतो, त्यामुळे बँक सर्व्हिस तत्काळ बंद करणं आवश्यक आहे. तुमचे सिम कार्ड आणि मोबाईल बँकिंग ॲप सिंक असतात, त्यामुळे रजिस्टर्ड नंबरवरील ओटीपीविना कोणीतही रक्कम ट्रान्सफर करणं कठीण आहे. परंतु फोन हरवल्यावर दोन्ही ब्लॉक करणे उत्तम.



**यूपीआय पेमेंट डीॲक्टिव्हेट करा**

जेव्हा तुम्ही ऑनलाइन बँकिंग सेवेपर्यंत पोहचू देत नाही तेव्हा चोर इतर मार्ग शोधू लागतो, ज्यात यूपीआयसारख्या पेमेंट ऑप्शनचा समावेश असतो.

हे साप्ताहिक मालक, मुद्रक, प्रकाशक - दिपक मोरेश्वर नाईक यांनी सोमानी प्रिंटिंग प्रेस, गाला नं. १, एन. के. इंडस्ट्रीयल इस्टेट, प्रवासी इंडस्ट्रीय इस्टेटच्या बाजूला, गेट नं. 2, गोरेगांव (पूर्व), मुंबई - 400 063 येथे छापून 2, गजाराम को. ऑ.हौ.सो. चंदरवाडी, नवघर रोड, शनी मंदिरा जवळ, भाईंदर (पूर्व), ठाणे - 401 105 येथे प्रकाशित केले. (सर्व वाद ठाणे न्यायालयाच्या कक्षेत) संपर्क:-9594418181 / 8424989898